**निशाणी २२**

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ३ याची जबानी</u>**
**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>**

माझे नाव – राजेंद्र धोंडीबा वाघ, वय – ६३ वर्षे,
व्यवसाय – शेती, राहणार – वाघवाडी–टाकळी,
तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर.

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

१. घटना दिनांक २९.०३.२०२३ रोजी सकाळी १०:०० ते १०:३० वाजणेच्या दरम्यान घडली होती. त्या दिवशी मी सकाळी माझी सासरवाडी गर्दणी येथे गेलो होतो. त्यानंतर मागून माझी पत्नी आली. तिने मला सांगितले की, तुम्हाला शिवाजी घोलप यांनी बोलावल्याचे सांगितले. त्यानंतर मी व माझी पत्नी आमचे घरी सकाळी १०:३० च्या नंतर आलो. आरोपींनी माझा मुलगा संजय याला दांडा व बॅटने मारले. मी आरोपींकडे गेलो व त्यांना सांगितले की, माझ्या मुलाने सायपन फोडले नाही, तो आमच्या जवळ झोपलेला होता. आरोपींनी मला व माझ्या पत्नीला दम दिला. त्यानंतर मी घरी निघून आलो. त्यानंतर मी माझ्या मुलाला सरकारी दवाखाण्यात आणले. तेथून त्यास नाशिक येथील सरकारी दवाखाण्यात नेले. त्यास रात्री तेथे ॲडमीट केले. दुस–या दिवशी मी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.

२. आता मला अभिलेखावरील मी दिलेली फिर्याद व छापील प्रथम खबर अहवाल दाखवण्यात आला. त्यावर माझा अंगठा असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी अनुक्रमे २३ व २४** देण्यात येते. मी आरोपींना ओळखतो. ते आजरोजी न्यायालयात हजर आहे. माझा

मुलगा संजय हा वारला आहे.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. ए. के. धुमाळ यांच्या मार्फत</u> –**

३. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या अगोदर माझा मुलगा संजय याचेवर उपचार चालू होते. हे म्हणणे खरे आहे की, नग्न अवस्थेत अंघोळ करणे, पाईप चोरणे, फोडणे, सायकली चोरणे याबाबत त्याचे विरूध्द पोलीस स्टेशनला अनेक तक्रारी दाखल झाल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, माझा मुलगा संजय हा गावात चो–या करतो याबाबत पोलीस स्टेशनला तक्रारी केलेल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलाने चोरी करून आणलेल्या वस्तू मी त्या–त्या लोकांना परत करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, चोरीच्या घटना ह्या वारंवार घडत होत्या व त्या वस्तू मी वारंवार परत करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, गावातील लोक माझ्या मुलाच्या माझ्याकडे तक्रारी करत होते व मी माझ्या मुलाला समजावून सांगत होतो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलाला समजावून सांगून सुध्दा त्याचा काही फरक पडत नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलाने मला सुध्दा मारहाण करून माझे समोरचे दात पाडले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझा मुलगा हा खानापुर येथे मोटारसायकल घेवून पाटात पडला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझा मुलगा रात्री बेरात्री फिरायचा, पडायचा त्यामुळे त्याला लागत होते त्यामुळे मी त्याला सरकारी दवाखाण्यात, नाशिक येथे उपचाराकरीता दाखल करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी माझा मुलगा हा रात्री पडला होता व त्यामुळे त्याला मार लागल्यामुळे ती त्यास दवाखाण्यात ॲडमीट केले होते.

४. हे म्हणणे खरे आहे की, टाकळी येथून गर्दणीला पायी

जाण्यास अर्धा तास लागतो. हे म्हणणे खरे नाही की, २८ तारखेच्या रात्री माझा मुलगा हा नेहमीप्रमाणे बाहेर पडला होता व त्याला मोठ्या प्रमाणात दुखापत झाली होती. मी सांगितलेल्या घटनेच्या वेळी माझा मुलगा संजय याचे वय २१ वर्ष एवढे होते. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा सज्ञान असल्यामुळे मी व तो वेगवेगळ्या खोलीत झोपायचो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलाने केलेल्या चो–यांबाबत आरोपींनी त्याच्या विरूध्द पोलीस स्टेशनला तक्रारी केल्या होत्या व त्यामुळे आम्हाला पोलीस स्टेशनला वारंवार बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे माझ्या मुला विरूध्द तक्रारी करतात म्हणून माझा त्यांचे विरूध्द राग होता. हे म्हणणे खरे आहे की, २९ तारलेखा टाकळी गावातील पाच पंचवीस लोक सकाळी १०:०० ते ११:०० च्या दरम्यान आमच्या घरासमोर जमा झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यांनी माझ्या मुलाने रात्री बारे फोडल्याची तक्रारी त्यांनी माझ्याकडे केली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या लोकांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. हे म्हणणे खरे आहे की, मी त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला परंतु ते ऐकत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे मी अकोले पोलीस स्टेशनला जावून त्यांचे विरूध्द तक्रार दिली.

५. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझा मुलगा संजय यास कधीही दांड्याने व बॅटने मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला दम दिला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींविरूध्द रागातून खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा जबाब देत आहे.

**निशाणी २२**

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2025.09.22 17:30:36 +0530

दिनांक २२.०९.२०२५
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले